मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका अडचणीत!

## गुइलेन बॅरे सिंड्रोमचा (जीबीएस) पुण्यात उद्रेक : 'जीबीएस' उद्रेकावरून 'एनजीटी'ची नोटीस

**पिंपरी | प्रतिनिधी**

गुइलेन बॅरे सिंड्रोमचा (जीबीएस) पुण्यात उद्रेक झाला होता. या प्रकरणी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने केलेल्या उपाययोजनांबाबत राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) विचारणा केली आहे. या दोन्ही महापालिकांना एनजीटीने नोटीस बजावली असून, चार आठवड्यांत उत्तर देण्यास सांगितले आहे.



पुण्यातील जीबीएसचा उद्रेक हा दूषित पाण्यामुळे झाल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर जीबीएसग्रस्त भागातील नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याचा पुणे आणि पिंपरी-चिंचवड या महापालिकांना निर्देश द्यावा, अशी मागणी करणारी याचिका विधीच्या विद्यार्थ्यांनी एनजीटीकडे केली आहे. या याचिकेत जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, राज्य सरकारचा पाणीपुरवठा विभाग व स्वच्छता विभाग यांना, तातडीने दूषित पाण्याचे स्रोत शोधून ते स्वच्छ करण्याचा आदेश देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. तसेच, सार्वजनिक आरोग्य विभाग, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आणि राज्याचा नगरविकास विभाग यांना तातडीने जीबीएस रुग्णांना वैद्यकीय मदत, उपचार आणि आर्थिक साहाय्य देण्याचे निर्देश देण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली आहे.

> "याचिकेत मांडण्यात आलेले मुद्दे आणि त्यासोबत सादर केलेल्या पुराव्यांवरून प्रथमदर्शनी पर्यावरणावर झालेल्या प्रतिकूल परिणांमाबाबत प्रश्न विचारण्यात आल्याचे दिसत आहे. याचिकेत मांडण्यात आलेले मुद्दे योग्य आहेत का आणि जीबीएसचा उद्रेक रोखण्यासाठी उपाययोजनांची माहिती दोन्ही महापालिकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे द्यावी.
>
> **- राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण.**

प्रदूषण करणाऱ्याला त्याच्या परिणामांची किंमत मोजावी लागते, या तत्त्वानुसार दोन्ही महापालिकांना जीबीएस उद्रेकाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल दंड करावा, असेही याचिकेत म्हटले आहे. एनजीटीने या याचिकेवरील सुनावणीवेळी पुणे आणि पिंपरी-चिंचवड या महापालिकांना नोटीस बजावली आहे. याचिकेत मांडण्यात आलेले मुद्दे योग्य आहेत का आणि जीबीएसचा उद्रेक रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या, याबाबत चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश एनजीटीने दोन्ही महापालिकांना दिले आहेत. याप्रकरणी पुढील सुनावणी १६ एप्रिलला होणार आहे.

# सोशल मीडियातून तरुणांची माथी भडकविण्याची कामे : राज ठाकरे

## 'मनसे'चा 19 वा वर्धापन दिन मेळावा चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित केला होता

**पिंपरी | प्रतिनिधी**

"सध्या महाराष्ट्रात राजकीय चिखल झाला आहे. जातीयवाद पसरविला जात आहे. सोशल मीडियातून तरुणांची माथी जाणूनबुजून भडकवली जात आहेत," असा हल्लाबोल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केला. 'मनसे'चा १९ वा वर्धापन दिन मेळावा चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित केला होता. या वेळी ठाकरे बोलत होते.

या वेळी डॉ. सदानंद मोरे, मनसेचे विद्यार्थी सेना प्रमुख अमित ठाकरे, शर्मिला ठाकरे, अनिल शिदोरे, बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, किशोर शिंदे, बाबू वागसकर, पिंपरी चिंचवड शहरप्रमुख सचिन चिखले आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

'महाराष्ट्र : काल, आज आणि उद्या' या विषयावर बोलताना डॉ. सदानंद मोरे म्हणाले, "प्रभू श्रीरामांचा राज्याभिषेक नाशिकमध्ये झाला. महाराष्ट्रात राहणारे सर्व मराठे होते. ते भारतात अग्रेसर आहेत. मवाळ, जहाल आणि क्रांतिकारी गटाचे नेतृत्व महाराष्ट्राने केले. महाराष्ट्रातील जातीयवादामुळे लोकमान्य टिळक यांच्यानंतर महाराष्ट्रातील नेत्यांकडे देशपातळीवरील नेतृत्व टिकले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील सर्व लोकांना सोबत घेऊन स्वराज्य घडविले. जातीचे ऐक्य गेले की राज्य नष्ट होते."



### राजमाता जिजाऊंच्या नावाने महिला दिन व्हावा

महिला दिनाच्या शुभेच्छा देताना राजमाता जिजाऊ यांच्या नावाने हा दिवस ओळखला पाहिजे. स्वराज्यासाठी मुलाकडून स्वराज्य घडवून आणण्याचे काम त्यांनी केले. पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचा अनेकांना विसर पडलेला आहे. सर्वात पुढारलेल्या महिला महाराष्ट्रात मिळतील, असेही ठाकरे यांनी नमूद केले.

### राज ठाकरे म्हणाले

गुढीपाडवा मेळाव्यात दांडपट्टा फिरवणार आहे. आता शाब्दिक चाकू, सुरे घेऊन फिरणार नाही.

विजय आणि पराभवाचे चढ- उतार येऊनही 'मनसे'तील पदाधिकारी एकत्र कसे याचा अनेकांना प्रश्न.

डोळा मारला की पक्ष बदल करणाऱ्या राजकीय फेरीवाल्यांना पक्षात स्थान नाही. आपण स्वतःच खणखणीत दुकान मांडू.

पुढील दोन दिवसात पक्ष रचना निश्चित करणार. प्रत्येकाची कामे ठरवलेली आहेत.

प्रत्येकाच्या कामाचा आढावा १५ दिवसांत घेणार. काम न करणाऱ्या पदाधिकाऱ्याला पदावर ठेवणार नाही.

### देशात नद्यांचे प्रदूषण

» "अनेक जण कुंभमेळ्याला जाऊन स्नान करून आले. एवढे पाप कशाला करता, असे मी पक्षातील पदाधिकाऱ्यांना विचारले. सध्या नदी प्रदूषित केली जात आहे. श्रद्धा असावी पण डोळस असावी. देशात एक नदी स्वच्छ नाही. नदीला माता म्हणतात आणि तिला अस्वच्छ करतात," असे ठाकरे म्हणाले.

# रवींद्र धंगेकरांचा काँग्रेसला रामराम!

## माजी आमदार रवींद्र धंगेकरांचा पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा : शिंदे गटात प्रवेश करणार

**पुणे | प्रतिनिधी**

काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर हे काँगेस सोडणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून चालू होती. अखेर ही चर्चा खरी ठरली आहे. धंगेकर यांनी काही वेळापूर्वी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन जाहीर केलं की त्यांनी काँग्रेसला आता रामराम केला आहे. त्यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. पत्रकार परिषदेत रवींद्र धंगेकर म्हणाले, अशा प्रकारचा (पक्ष सोडण्याचा) कोणताही निर्णय हा प्रचंड कठीण असतो.

माजी आमदार धंगेकर म्हणाले, मी गेल्या १०-१२ वर्षांपासून या पक्षाबरोबर काम करत आहे. पक्षाबरोबर एक कौटुंबिक नातं तयार झालं आहे. पक्षातील सहकारी हे कुटुंबातील सदस्य बनले आहेत. सर्वांनी माझ्यावर प्रचंड प्रेम केलं. मी गेल्या वर्षी लोकसभा निवडणूक लढवली, विधानसभा निवडणूक लढवली, या काळात पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी माझ्यामागे मोठी ताकद उभी केली. त्यांच्या जोरावरच मी त्या निवडणुका लढवू शकलो. मी निवडणुकीत पराभूत झालो ती वेगळी गोष्ट आहे. मात्र पक्षातील लोकांनी माझ्यासाठी कष्ट केले. सर्वांनी माझ्याबरोबर ताकद उभी केली होती. त्यामुळेच आता पक्ष सोडताना मला खुप दुःख होत आहे.



### शिवसेनेत (शिंदे) प्रवेश करणार

» माजी आमदार धंगेकर म्हणाले, मी शिवसेनेच्या (शिंदे) वाटेवर असल्याच्या बातम्या मधल्या काळात वर्तमानपत्रांनी दिल्या होत्या. त्यानंतर डोक्यावरून बरंच पाणी गेलं. दरम्यान, माझ्या मतदारसंघातील नागरिकांशी चर्चा केल्यानंतर ते म्हणाले, 'तुम्हाला जनतेची कामं करावी लागतील'. मात्र, सत्ता असल्याशिवाय कामं होत नाहीत. याच काळात मी एकनाथ शिंदे यांना भेटलो होतो. तसेच मी आमदार असताना आणि ते मुख्यमंत्री असताना त्यांनी माझ्या मतदारसंघातील कामं मार्गी लावण्यासाठी सहकार्य केलं होतं. त्यांचा चेहरा जनतेत लोकप्रिय आहे. त्यामुळे आम्ही निर्णय घेतला की सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय असलेल्या या चेहऱ्याबरोबर जाण्यास काहीच अडचण येणार नाही. त्यामुळे आज संध्याकाळी मी त्यांना भेटणार आहे. त्यानंतर आमचा जो निर्णय होईल तो जाहीर करू.

### पक्ष सोडण्याचा निर्णय का घेतला?

रवींद्र धंगेकर म्हणाले, आपण सगळी माणसं आहोत. अशा प्रसंगी आपल्याला दुःख होतंच. मात्र, कार्यकर्ते गेल्या काही दिवसांपासून सांगत होते, चर्चा करत होते. माझी मतदारांशी चर्चा झाली. त्या सर्वांचं म्हणणं आहे की आमची कामं कोण करणार? लोकशाहीत सत्ता असल्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांना आपण न्याय देऊ शकत नाही, त्यांची कामं करू शकत नाही. अशा वेळी माझी दोन-तीन वेळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट झाली. मी त्यांच्याशी चर्चा केली. मंत्री उदय सामंत हे देखील माझे मित्र आहेत. माझी त्यांच्याशी देखील चर्चा झाली. त्यांनी वारंवार सांगितलं की एकदा आच्याबरोबर काम करा.

# एसटी स्थानकांमध्ये महिला सुरक्षारक्षक बंधनकारक

## 'एसटी' महामंडळाच्या 14 आगारांमधील 42 बस स्थानकांचे सुरक्षाविषयक लेखापरीक्षण

**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेट बस स्थानकातील बलात्कार प्रकरणानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) त्रिसदस्यीय समितीने केलेल्या सुरक्षाविषयक लेखापरीक्षणामध्ये जिल्ह्यातील १४ आगारांमधील ४२ बस स्थानकांमध्ये महिला सुरक्षारक्षक नेमणे बंधनकारक करण्याची शिफारस केली आहे. सध्या या बस स्थानकांमध्ये एकही महिला सुरक्षारक्षक नसल्याने प्रमुख बस स्थानकांमध्ये प्रत्येकी सहा आणि अन्य बस स्थानकांत दोन ते तीन महिला सुरक्षारक्षक नेमण्याचे या अहवालात सुचविण्यात आले आहे.

राज्य सरकारच्या निर्देशानुसार पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह ग्रामीण भागातील 'एसटी' महामंडळाच्या १४ आगारांमधील ४२ बस स्थानकांचे सुरक्षाविषयक लेखापरीक्षण करण्यात आले असून, संबंधित अहवाल ४ मार्च रोजी राज्य सरकारकडे पाठविण्यात आला. या अहवालात स्वारगेट, वाकडेवाडी आणि बारामती या प्रमुख स्थानकांमध्ये सुरक्षायंत्रणेत अभाव असल्याचे स्पष्ट करण्यात आले. स्वारगेट आणि वाकडेवाडी या वर्दळीच्या बस स्थानकांमध्ये केवळ प्रत्येकी २३ सुरक्षारक्षक आणि २४ सीसीटीव्ही कॅमेरे आहेत, तर बारामती शहरातील बस स्थानकात ४२ सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. उर्वरित ग्रामीण भागातील प्रत्येक बस स्थानकामध्ये आठ सीसीटीव्ही यंत्रणा असून, ती वाढविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ४२ स्थानकांमध्ये १८० सुरक्षारक्षक आहेत. हे सुरक्षारक्षक खासगी एजन्सीद्वारे नेमण्यात आले असून, त्यामध्ये एकही महिला सुरक्षारक्षक नाही. त्यामुळे प्रत्येक बस स्थानकात महिला सुरक्षारक्षक नेमाव्यात. प्रमुख बस स्थानकांमध्ये प्रत्येकी सहा आणि इतर बस स्थानकांत दोन ते तीन महिला सुरक्षारक्षकांची नेमणूक करणे बंधनकारक करावे, अशी शिफारसही करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ४२ बस स्थानकांत ४० सीसीटीव्ही, ४० अतिरिक्त सुरक्षारक्षक आणि सुरक्षाभिंती वाढविण्याबाबतच्या शिफारशीही करण्यात आल्या आहेत.



### 'सुरक्षा भिंतींची उंची वाढवावी'

» ग्रामीण भागातील नारायणगाव, इंदापूर, भोर, दौंड, बारामती, एमआयडीसी शिरूर, वल्लभनगर, मंचर, राजगुरूनगर, तळेगाव दाभाडे आणि सासवड या आगारांत ३५ हून अधिक बस स्थानके आहेत. त्यांपैकी अनेक बस स्थानकांमध्ये सुरक्षाभिंतींची दुरवस्था झाली असल्याचे तपासणी आढळून आले आहे. अनेक सुरक्षाभिंतीची उंची अपेक्षापेक्षा कमी आहे. त्यामुळे स्थानकात भटक्या कुत्र्यांचा, प्राण्यांचा वावर जास्त असून, प्रवाशांचे सामान चोरी होण्यासारख्या घटना घडत असतात. बस स्थानक परिसरात खासगी प्रवासी वाहनांची वाहतूक होत असते, त्यामुळे अपघात होण्याची संभावना नाकारता येत नाही. त्यामुळे सुरक्षा भिंतींची उंची वाढवून वेळोवेळी दुरुस्ती आणि देखभाल व्हावी, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

> सुरक्षाविषयक लेखापरीक्षण अहवालानुसार अनेक प्रमुख बस स्थानकांमध्ये सीसीटीव्ही आणि सुरक्षारक्षकांची संख्या अपेक्षेपेक्षा कमी असल्याने ही यंत्रणा वाढविण्याबाबतच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. बस स्थानकांतील प्रवाशांच्या वर्दळीनुसार सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जात आहेत. राज्य सरकारकडून मंजुरी मिळताच तातडीने सुरक्षा वाढविण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येईल.
>
> - प्रमोद नेहूल, विभाग नियंत्रक, 'एसटी'महामंडळ, पुणे.

# हाऊसिंग सोसायट्यांना मिळणार आमदार निधी

## शहरातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या आवारात विकास कामे करण्यासाठी 50 लाख रुपयांपर्यंत स्थानिक आमदार निधी खर्च करण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या आवारात विकास कामे करण्यासाठी ५० लाख रुपयांपर्यंत स्थानिक आमदार निधी खर्च करण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. खासगी जागेत सरकारी निधी खर्च करण्यास देण्यात आलेल्या या परवानगीने शहरांतील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना फायदा होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमधील रस्त्यांचे डांबरीकरण, पेव्हिंग ब्लॉक बसवणे, जॉगिंग ट्रॅक विकसित करणे, व्यायामशाळा; तसेच छोटी मैदाने तयार करणे आदी विकासकामांसाठी आमदार निधी खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे. भाजपचे चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी काही महिन्यांपासून गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये निधी खर्च करण्यास परवानगी मिळावी, यासाठी पाठपुरावा केला होता. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहनिर्माण सोसायट्यांच्या आवारात निधी खर्च करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला. याबाबतचे परिपत्रक सरकारकडून काढण्यात आले आहे.

पूर्वी खासगी जागांवर महापालिका किंवा राज्य सरकारचा निधी खर्च करण्यास परवानगी नव्हती. मात्र, अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये रस्ता, पाणी, कचरा, व्यायामशाळा किंवा उद्यानांशी संबंधित कामे करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. सोसायट्या दीर्घकालीन झाल्यानंतर त्यांना ही कामे करण्यास पुरेसा निधी उपलब्ध नसतो. त्यामुळे निवडणुकांमध्ये उमेदवारांकडून ही कामे करून घेण्यासाठी दबाव आणण्यात येत असल्याचे प्रकार दिसतात. या पार्श्वभूमीवर या सोसायट्यांची गरज पाहता तेथे सरकारी निधी खर्च करण्यास परवानगी मिळावी, याचा पाठपुरावा आमदार जगताप यांनी सुरू केला होता.

शासनाने आमदार स्थानिक विकास निधीचा उपयोग करण्यास 'ब' दर्जा असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना मंजुरी दिली आहे. शासनाच्या नियोजन विभागाने ४ मार्च २०२५ रोजी यासंदर्भात परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील तसेच या क्षेत्राला लागून असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जागेवर पायाभूत सुविधांची कामे आता आमदार निधीतून करता येणार आहेत. त्यासाठी एका आमदाराला वर्षभरात सोसायट्यांच्या एकूण २.५० कोटी रुपयांपर्यंतच्या कामांसाठी शिफारस करता येणार आहे. त्यासाठी शासनाने घालून दिलेल्या अटी-शर्तींचे संबंधित सोसायट्यांना पालन करावे लागणार आहे.



### काय आहेत नवे नियम?

» कोणत्याही गृहनिर्माण सहकारी संस्थेला आमदार निधीतून काही कामे करवून घ्यायची असतील तर सरकारच्या नवीन शासकीय आदेशानुसार (जीआर) त्यासाठी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. संस्थेने मागील तीन वर्षांमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि नियम १०६१ अंतर्गत विहित कालावधीत नियमित वार्षिक सर्वसाधारण सभा घेतलेल्या असाव्यात. प्रत्येक सभेचे इतिवृत्त सहकारी विभागाच्या संबंधित क्षेत्राच्या निबंधकांकडे लेखापरीक्षण अहवालासह सादर केलेले असावे. संबंधित गृहनिर्माण सहकारी संस्थेविरोधात सहकारी संस्था कायद्याच्या कलम ८३ आणि ८८ अंतर्गत कोणतीही कारवाई झाली नसावी. याशिवाय, संस्थेच्या किमान निम्म्या सदस्यांनी देखभाल खर्चाची आणि सामायिक क्षेत्राच्या व्यवस्थापनाशी संबंधित खर्च थकवलेला नसावा.

### सहकारी गृहनिर्माण संस्था करु शकतील पुढील कामे

- » रेन वॉटर हार्वेस्टींग: पाणीपुरवठा आणि जलसंधारणास चालना.
- » घनकचरा व्यवस्थापन: कचऱ्यावर प्रक्रिया आणि सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प.
- » सौर ऊर्जा प्रकल्प: सौर उष्णजल संयंत्र, सौर दिवे आणि नेट मिटरिंग.
- » ईव्ही चार्जिंग स्टेशन्स: स्वच्छ ऊर्जा प्रोत्साहन.
- » रस्ते व पदपथ सुधारणा: प्लास्टिकचा पुनर्वापर करून रस्ते व पेव्हर ब्लॉक्स बसवणे.
- » व्यायाम व हरित क्षेत्र: जॉगिंग ट्रॅक, ग्रीन जिम, मुलांसाठी खेळाचे साहित्य आणि वरिष्ठ नागरिकांसाठी विश्रांती कट्टे

# महापालिका कर्मचाऱ्यांसाठी धन्वंतरी गोल्ड योजना

## आरोग्य विमा योजनेचा लाभ 10 हजार 493 कर्मचारी, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना होणार लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

आरोग्य विमा योजनेबाबत होणाऱ्या वारंवार तक्रारी विचारात घेता महापालिका प्रशासनाने कर्मचाऱ्यांसाठी पुन्हा धन्वंतरी गोल्ड योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा कार्यरत आणि सेवानिवृत्त अशा १० हजार ४९३ कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना लाभ होणार आहे. योजनेत एका कुटुंबासाठी वर्षाकरिता २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही योजना १० वर्षांसाठी लागू करण्यात आली असून याची अंमलबजावणी १२ मार्चपासून सुरू करण्यात येणार आहे.

महापालिकेच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असलेली धन्वंतरी स्वास्थ्य योजना बंद करून २०२४ मध्ये आरोग्य विमा योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तक्रारी वाढल्या होत्या. यावरून कर्मचाऱ्यांमध्ये दोन गट पडले होते. चर्चेअंती पूर्वीच्या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत सुधारणा करून धन्वंतरी गोल्ड योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेचा कार्यरत ६ हजार ७५९ कर्मचारी, पती, पत्नी आणि दोन अपत्य तर सेवानिवृत्त झालेल्या ३ हजार ७३४ कर्मचारी आणि त्यांच्या पत्नीला योजनेला लाभ मिळणार आहे. कायमस्वरूपी अपंगत्व असलेल्या त्यांच्या अपत्यालाही लाभ मिळणार आहे. या योजनेत सर्व आजार समाविष्ट आहेत.

वर्ग १ आणि वर्ग २ च्या कर्मचा-यांना प्रतिमहिना दीड हजार रुपये, वर्ग तीनच्या कर्मचा-यांना ११०० रुपये तर वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांना ७०० रुपयांचा स्वहिस्सा द्यावा लागणार आहे. यामधून १२ कोटी १७ लाख ३१ हजार ६०० जमा होणार आहेत. उर्वरित रक्कम महापालिकेच्या फंडातून जमा केली जाणार आहे. या योजनेअंतर्गत पिंपरी-चिंचवड, पुणे शहरातील ५० रुग्णालय व सिंगल स्पेशालिटीचे १० रुग्णालयांबरोबर करारनामा करण्यात आला आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास या योजनेत रुग्णालयांची संख्या वाढविण्यात येणार आहे. या योजनेसाठी वर्षाकाठी ५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दरम्यान, २० लाखांपुढील उपचारावर खर्च झाल्यास वाढीव खर्चासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या १५ जणांची समिती निर्णय घेणार आहे.




### मद्यप्राशनामुळे झालेल्या आजारांचा समावेश नाही

» एखाद्या कर्मचाऱ्याला मद्यप्राशनामुळे आजाराची लागण झाली असल्यास डॉक्टरांनी त्यांचे मद्यप्राशनाचे कारण दिल्यास कर्मचाऱ्याला धन्वंतरी गोल्ड योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

> महापालिका कर्मचाऱ्यांसाठी सुरू असलेली आरोग्य विमा योजना ११ मार्च रोजी बंद होणार आहे. त्याऐवजी धन्वंतरी गोल्ड योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी वर्षाकाठी ५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी

# संतोष देशमुख हत्येप्रकरणी बारामतीत विराट मोर्चा

## मराठा क्रांती मोर्चाकडून बारामतीत सर्वधर्मीय निषेध मोर्चा व सभेचे आयोजन करण्यात आले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा मिळावी, या गुन्ह्याच्या तपासात माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा सहभाग आढळल्यास त्यांना सहआरोपी करावे, अशी मागणी बारामतीत रविवारी (दि. ९) निघालेल्या विराट मोर्चाद्वारे करण्यात आली. देशमुख यांचे बंधू धनंजय व मुलगी वैभवी यांच्या भाषणाने उपस्थितांच्या डोळ्यातून पाणी आले.

मराठा क्रांती मोर्चाकडून बारामतीत सर्वधर्मीय निषेध मोर्चा व सभेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील कसबा येथील छत्रपती शिवाजी उद्यानात महाराजांच्या पुतळ्याला देशमुख कुटुंबियांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करत मोर्चाला सुरूवात झाली. सर्व व्यवहार बंद ठेवत शहर व तालुक्यातील नागरिक, महिला मोठ्या संख्येने मोर्चात व त्यानंतरच्या सभेला उपस्थित होत्या. या मोर्चामध्ये गर्दी प्रचंड झाली होती. मराठा आरक्षणासाठी व कोपर्डीतील घटनेच्या निषेधार्थ निघालेल्या बारामतीतील मोर्चाची आठवण यानिमित्ताने बारामतीकरांना झाली. बारामतीसह इंदापूर, दौंड, पुरंदर, फलटण या तालुक्यातील नागरिक सहभागी झाले होते. महिला, युवक, युवतींची देखील संख्या लक्षणीय होती. हा मोर्चा गुणवडी चौकामार्गे मारवाड पेठेतून गांधी चौक व सुभाष चौक मार्गे भिगवण चौकात आला. या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले. या मोर्चात दोन युवतींनी प्रातिनिधिक स्वरूपात भाषण केले.

यावेळी देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करताना त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांना रडू कोसळले. त्यांना आधार देत व्यासपीठावर बसविण्यात आले. धनंजय व वैभवी यांच्या भाषणांमुळे उपस्थितांच्या डोळ्याला धारा लागल्या. तुम्ही पाहताय एवढी साधी बीडची स्थिती नाही. अत्यंत भीषण परिस्थिती तेथे आहे. चुकीच्या गोष्टींना राजकीय पाठबळ मिळाल्याने हे घडत असल्याचे धनंजय देशमुख यावेळी म्हणाले. ठराविक लोकांकडे सगळी सूत्रे गेल्याने मोठ्या प्रमाणावर गुंडगिरी, दहशत बोकाळली असल्याचे ते म्हणाले.

गावच्या विकासासाठी कार्यरत माझ्या वडिलांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करत त्यांना काय मिळाले, असा सवाल वैभवीने यावेळी केला. वडिलांच्या हत्येनंतर त्यांचा चेहरा देखील पाहता आला नाही. आमच्यासोबत राज्यातून लोक उभे राहत आहेत. ही लढाई अखेरपर्यंत लढावी लागेल, असे वैभवी म्हणाली. प्रांताधिकारी वैभव नावडकर यांनी निवेदन स्विकारले.



### कृष्णा आंधळे अद्यापही फरार, ज्यांनी त्याला अभय दिलं त्यांनी शोधून काढावं

» सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील कृष्णा आंधळे हा आरोपी अद्यापही फरार आहे. या प्रश्नावर बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, सदर हत्या प्रकरणातील सर्व सराईत गुन्हेगारांची टोळी होती. ते सर्व पोलिसांबरोबर सर्रास वावरत होते. तो फरार असतानाही तो पोलिसांशी सर्रास वावरत होता. त्याला पोलिसांचे अभय होते. फरार आरोपी यंत्रणेलाच घाबरत नसेल तर तो सर्वसामान्यांना काय घाबरणार असा सवाल उपस्थित करत ज्या लोकांनी त्याला अभय दिलं त्यांनीच त्याला शोधून काढावं, असेही देशमुख म्हणाले.

### मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्या

» या गुन्ह्यात धनंजय मुंडे यांची सखोल चौकशी करून त्यांचा संबंध आढळल्यास त्यांना सहआरोपी करत फाशीची शिक्षा देण्यात यावी.

» आरोपींच्या विरोधातील खटला हा त्या जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये न चालवता तो इतर जिल्ह्यात किंवा मुंबईला चालवला जावा, कारण आरोपींची बीड जिल्ह्यात मोठी दहशत आहे.

» हा खटला जलदगतीने न्यायालयात चालविण्यात यावा.

» फरार आरोपींना तात्काळ अटक करून अन्य सहआरोपींच्या विरोधातही गंभीर दखल घेत गुन्हा दाखल करण्यात यावा.

» आरोपींना कारागृहात दिली जात असलेली शाही वागणूक बंद करावी.

» गुन्ह्यातील अटक आरोपींना बीड जिल्ह्यामध्ये न ठेवता इतर जिल्ह्यातील कारागृहात ठेवावे. जेणेकरून कारागृहातून ते स्वतःचे गुन्हेगारी साम्राज्य चालवू शकणार नाहीत.

» जास्तीत जास्त पुरावे देवून आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी.

# 100 दिवसांत पुरंदरमध्ये 1318 प्रस्तावांना मंजुरी, तहसीलदार विक्रम राजपूत यांची माहिती

## राज्य शासनाने क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांसाठी 100 दिवसांचा कृती आराखडा निश्चित केला होता.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील जनतेची शासकीय स्तरावरील विविध कामे कमी खर्चात आणि तातडीने व्हावीत. राज्य शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होवून सहजता निर्माण व्हावी यासाठी राज्य शासनाने क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित केला होता.

यात सातकलमी कार्यक्रम ठरवून दिला होता. यामध्ये शासनाने ठरवून दिलेल्या १०० दिवसांच्या कार्यकाळात पुरंदरच्या प्रशासनाकडून १३१८ विविध प्रस्तावांना मंजुरी देऊन पूर्ण झाल्याची माहिती तहसीलदार विक्रम राजपूत यांनी दिली आहे.

अभियानांतर्गत नागरीकांना वारस नोंद, लक्ष्मी मुक्ती योजनेचा लाभ, पाणंद रस्ते खुले करणे, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना पेन्शन सुरु करणे, विविध दाखले वाटप, नव मतदार नोंदणी, शेतक-यांना फार्मर आयडी तयार करणे, रेशन कार्ड आदी सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत

पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांच्या सूचनेनुसार पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे आणि तहसीलदार विक्रम राजपूत यांनी निवासी नायब तहसीलदार संदीप पाटील, महसूल नायब तहसीलदार सोनाली वाघ, निवडणूक नायब तहसिलदार शुभांगी गोंजारी, संजय गांधी योजना नायब तहसीलदार महादेव जाधव, मंडलाधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रयत्न केले.

राज्य शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होवून सहजता निर्माण व्हावी यासाठी राज्य शासनाने क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित केला होता.



### पुरंदरमधील नागरिकांना दिलेल्या सेवा आणि लाभार्थी

» वारस नोंद १२२, लक्ष्मी मुक्ती योजना २५, पाणंद रस्ते व नकाशावरील रस्ते ७०, संजय गांधी अनुदान योजना ३४, विविध प्रकारचे दाखले वाटप २९१, प्रलंबित फेरफार निर्गती व निकाल ५८, अग्रीस्टॅक अंतर्गत शेतक-यांना ओळखपत्र ६८७ नव मतदार नोंदणी ४०, शिधापत्रिका १४. एकूण १३१८.

> नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा तातडीने देण्यात येणार आहे. सर्व लाभार्थी, नागरिकांनी आपल्याला मंजूर असलेल्या योजनेचा लाभ घ्यावा. यामध्ये काही अडचण आल्यास संबंधित विभागाचे नायब तहसीलदार, अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.
>
> - विक्रम राजपूत, तहसीलदार, पुरंदर.